# प्रकरण चार

# आरोग्य विभाग

**4.283 आरोग्य विभागांतर्गत ग्राम बालविकास केंद्र सुरु करणे (VCDC) योजनेंतर्गत अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जव्हार, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती जव्हार अंतर्गत सन 2015-16 या वित्तीय वर्षात, जव्हार तालुक्यातील सदर योजनेंतर्गत कुपोषित (सॅम व मॅम श्रेणीतील) बालकांसाठी, आरोग्य विभागांतर्गत, ग्राम बाल विकास केंद्र सुरु करणे (VCDC) योजनेंतर्गत एकूण रक्कम रुपये 8,40,000/- खर्च नोंदविला आहे. सदर योजनेच्या खर्च नस्तीची पडताळणी केली असता याबाबत खालील अभिप्राय आहेत.

1) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांचेकडील पत्र क्रमांक VCDC/आस्ता/वशी/149/2015, दिनांक 01/06/2015 नुसार आयुक्त यांचेकडील दिनांक 18/03/2015 च्या पत्रानुसार ग्राम बालविकास योजना (VCDC) सन 2015-16 प्रकल्प अंमलबजावणी आराखडा केंद्र शासनाकडून मंजूर होईपर्यंत सन 2014-15 प्राप्त सुचनांप्रमाणे सुरु ठेवावयाची आहे. तरी सदर योजनेची अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून सन 2015-16 चा अंमलबजावणी आराखडा मंजूर झाला किंवा कसे याबाबतचे पत्र लेखापरीक्षणाचे वेळी पहावयास मिळाले नाही. सदर योजनेचा अंमलबजावणी आराखडा केंद्र शासनाकडून मंजूर झालेला नसताना सदर योजना काय आधारे राबविण्यात आली याबाबत खुलासा करावा.

2) तालुका आरोग्य अधिकारी यांच्या दिनांक 22/02/2016 च्या टिपणीनुसार आय.सी.डी.एस. विभागामार्फत नियोजनाकरीता सॅम मुले एकूण 145 व मॅम मुले 818 प्राप्त झाली आहेत. परंतु अनुदान रुपये 8,40,000/- प्राप्त झाले असल्याने प्रती बालक रुपये 1,200/- प्रमाणे 700 बालके VCDC मध्ये दाखल होऊ शकतात व सॅम बालके प्रायोरिटी देऊन मॅम बालके गरजेनुसार भरती होऊ शकतात, असे नमूद केले आहे व एकूण 700 बालकांना सदर योजनेंतर्गत लाभ दिला असल्याचे दिसून येते. उर्वरीत 118 बालकांना लाभ दिला असल्याचे दिसून येत नाही. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडील पत्र जावक क्रमांक VCDC/आस्ता/वशी/149/2015, दिनांक 01/06/2015 नुसार जिल्हयातील अंदाजित मुलांच्या संख्येनुसार अनुदान वितरीत करण्यात आले आहे. यापेक्षा जादा अनुदानाची गरज भासल्यास त्वरित मागणी करावी. असे असतांना 118 बालाकानासाठी अनुदानाची मागणी का करण्यात आली नाही याबाबत खुलासा करावा. उपरोक्त अनुदानाची मागणी न केल्यामुळे गटातील 118 बालके योजनेच्या लाभापासून वंचित राहिली आहेत. तरी याबाबत खुलासा करावा.

3) सदर योजनेंच्या अंमलबजावणीसाठी ग्राम बालविकास शिबिरासाठी काम करणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे उपचार व आहाराबाबतचे प्राशिक्षण प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर करावयाचे आहे. तसेच आरोग्य विभाग व आय.सी.डी.एस. विभागामध्ये समन्वय ठेवण्यासाठी दोन्ही विभागातील अधिकारी यांच्या दर आठवडयात आढावा बैठका घ्यावयाच्या आहेत. तथापि, अशी कार्यवाही झाली असल्याचे दिसून येत नाही. तरी अशी कार्यवाही झाली असल्याची खात्री करावी.

4) जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडील पत्र जावक क्रमांक VCDC/आस्ता/वशी/149/2015, दिनांक 01/06/2015 नुसार संदर्भिय सुचना पुस्तिकेत आजारी नसलेल्या सॅम बालकांना अंगणवाडी मधील ग्राम बालविकास केंद्रामध्ये दाखल करून उपचार करण्यात यावेत. तसेच आपल्या कार्यक्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र व मुख्य सेविका आय.सी.डी.एस. तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या पथकाने प्रत्यक्ष तपासणी करून सॅम व मॅम मुलांच्या यादीचे पृथ:करण करून अंतिम यादीतील सॅम बालाकांसाठीचे माहे जून, 2015 साठीचे नियोजन करण्यात यावे. तसेच आपल्याकडील प्राप्त मागणीप्रमाणे निधी वितरीत करण्यासंबधी कार्यवाही सुरु असून लवकरच निधी उपलब्ध केला जाईल. माहे जून, 2015 मध्ये VCDC नियोजन करून तसा अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. तथापि, सदर योजनेस निधी पंचायत समितीकडील व्हौ. क्रमांक 77, दिनांक 26/02/2016 रुपये 8,40,000/- नुसार उपलब्ध करून माहे मार्च, 2016 मध्ये योजना राबविली आहे. तरी नियोजनानुसार योजनेची

अंमलबजावणी का करण्यात आली नाही? माहे जून, 2015 मध्ये योजनेची अंमलबजावणी न केल्याने योजनेचा उद्देश सफल झाला नाही? या बाबत खुलासा करावा.

5) सदर योजनेवरील खर्चाचे अनुषंगाने योजनेच्या अंमलबजावणी बाबतचा अंगणवाडी सेविकांकडील खर्चाचा अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र लेखा तपासणीचे वेळी पहावयास मिळाला नाही. तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती, जव्हार यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रमांक ताआअ/आवी/वशी/111/16, दिनांक 16/03/2016 नुसार एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी जव्हार 1 व जव्हार 2 यांचेकडे खर्चाचा अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र मागणी केले आहे. तथापि, सदरचा अहवाल लेखा तपासणी दिनांकाअखेर पर्यत प्राप्त झाला नाही. त्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेचा मूळ उद्देश सफल झाला किंवा कसे, याबाबतची खात्री करता आली नाही. तरी सदरचा अहवाल प्राप्त करून लेखा तपासणीस सादर करावा.

**4.284 सेस निधीतून अपंगांसाठी 3 टक्के राखीव खर्चाबाबत.**

**पंचायत समिती डहाणू, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2015-16 या आर्थिक वर्षात पंचायत समिती डहाणूने सेस निधीतील राखीव 3 टक्के रकमेतून अंपगासाठी घरघंटी व शिलाई मशिन खरेदी केलेली आहेत. त्यावर पुढीलप्रमाणे आक्षेप. (नस्तीमधील उपलब्ध कागद पत्रावरून)

1) प्रशासकिय मंजुरी व तांत्रिक मंजुरी गटविकास अधिकारी यांची आहे. (दिनांक 15/02/2016) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त 9, दिनांक 31/01/2013 नुसार रूपये 5.00 लाखांपर्यत गटविकास अधिकारी यांना प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी देण्याचे अधिकार आहेत. परंतू, टिप 1 नुसार पुढील पंचायत समिती सभेत अवलोकनार्थ सदर प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी सादर करणे आवश्यक आहे. परंतू, तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच प्रत्यक्षात खरेदी रुपये 5.00 लाखापेक्षा जादा असल्याने प्रशासकिय व तांत्रिक मंजुरीचे अधिकार वरील शासन निर्णयानुसार सभापतीना आहेत.

2) सदर खरेदीसाठी ई-निविदा प्रसिध्द केलेल्या आहेत. परंतू सदर निविदा कधी प्रसिध्द केल्या व किती कालावधीसाठी दिल्या त्याबाबतचे दैनिक नस्तीमध्ये उपलब्ध झाले नाहीत.

3) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अंपग 2015/प्र.क्र.137/वित्त-3, दिनांक 24/11/2015 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अंपग व्यक्तीना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देणे असतांना आर्थिक मदत न करता वस्तू रूपाने सहाय्य केलेले आहे. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांनी निर्गमित केलेल्या दिनांक 18/11/2015 च्या शासन निर्णयाव्दारे गठीत करण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय व तालुका स्तरीय समितीच्या सल्ल्याने वैयक्तिक लाभाच्या योजनेवर खर्च करावा, असे असतानाही सदर समितीचा सल्ला घेतलेला नाही.

4) उपलब्ध ई-निविदा मधील माहितीनुसार हुसेन ट्रेडर्स यांची सर्वात कमी दराची म्हणजे घरघंटी रुपये 16,200/- व शिलाई मशिन रुपये 8,200/- ची निविदा मंजूर करण्यात आली. परंतू, ठराव उपलब्ध झालेला नाही. असे असतानाही पुरवठा आदेश क्रमांक पंसड/आरोग्य/वशी/83/2016, दिनांक 29/03/2016 अन्वये घरघंटीचा दर रुपये 18,125/- व शिलाई मशिन दर रुपये 9,166/- नमूद केलेला आहे. त्याबाबत खुलासा करावा.

5) घरघंटी व शिलाई मशिन खरेदीसाठी महाराष्ट्र शासनाने दर केलेल्या पुरवठादाराकडून खरेदी करणे आवश्यक होते.

6) प्रत्यक्षात बाजारभावाशी तुलना केलेली नाही.

7) साठा नोंदवहीला दिनांक 30/03/2016 रोजी 16 नग घरघंटी 24 नग शिलाई मशिन जमा घेतलेल्या आहेत. परंतू, त्यापैकी 10 घरघंटी व 11 शिलाई मशिन आजतागायत लाभार्थ्यांना वाटप केलेल्या नाहीत.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट - ई नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांचे वाटप आर्थिक वर्षात नोव्हेंबर पूर्वी होणे आवश्यक असताना वरील घरघंटी व शिलाई मशिनचे वाटप अद्याप झालेले नाही. वरील परिपत्रकानुसार लाभार्थी निवड 31 मे अखेर, खरेदी प्रक्रिया 31 ऑगस्ट अखेर, पुरवठा आदेश 30 सप्टेबर अखेर,

वाटप 30 नोव्हेंबर अखेर, देयके अदा करणे 31 जानेवारी अखेर, विनियोग दाखले प्राप्त करून घेणे मार्च अखेर असे असतानाही प्रत्यक्षात तशी कार्यवाही झालेली नाही.

9) सदर तरतूद अंपग कल्याणातून असल्यामुळे ती समाज कल्याण विभागातून न करता आरोग्य विभागाने केलेली आहे.

**4.285 10 टक्के राखीव उपकर निधीतून मागास महिला लाभार्थींना शिलाई मशिन पुरवणे बाबत.**

**पंचायत समिती पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती पन्हाळाकडील महिला बालकल्याण विभागामार्फत मागास महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशिन पुरविणेकरीता प्रमाणक क्रमांक 5, दिनांक 01/03/2016 अन्वये 4,64,292/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये परिशिष्ठ “ड” नुसार जिल्हा परिषदेकडील वैयक्तिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी वेळापत्रकानुसार योजनेची तरतूद मे 13 पूर्वी करणे, समित्यांची मंजूरी जून 30 पूर्वी घेणे, तांत्रिक मंजूरी 31/08/2013 पूर्वी घेणे, प्रस्ताव छाननी 31 जुलै अखेर करणे, साहित्य पुरवठा आदेश 30 नोव्हेंबरपूर्वी देणे व लाभार्थी साहित्य वाटप 31/01/2014 अखेर करणे आणि विनियोग दाखले मार्च 2014 अखेर घेऊन योजनेचे उद्दीष्ट पूर्ण करणे असे असतांना तशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

2) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक परास/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1995 नुसार साहित्य खरेदीचा पुरवठा आदेश देणेपूर्वी लाभर्थ्याकडून लोक हिश्श्याची रक्कम वसूल करणे बंधनकारक असताना लाभार्थीचा हिस्सा वसूल न करताच पुरवठा आदेश देणेत आला आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार सदर योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थ्यांच्या आर्थीक स्थितीमध्ये झालेल्या सुधारणा झाल्याबाबत अहवाल घेतलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/64, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय, कुटूंबनिहाय/लाभार्थी निहाय व प्रवंर्गनिहाय तालुकास्तरांवर व ग्रामपंचायत स्तरावर नोंदवही ठेवून लाभार्थ्यांला लाभ दिल्यानंतर जो लाभ दिला त्या लाभाची त्या नोंदवहीमध्ये नोंदी घेणेत आलेल्या नाहीत. एकाच कुटूंबात दूबार लाभ दिला जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारची नोंदवही पंचायत समिती स्तरांवर ठेवण्यात आलेली नाही.

5) शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/भा.3/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील अट क्रमांक 6.8 परी-8 परिच्छेद 3.1.2.1 प्रमाणे 5.00 लाख ते 10.00 लाख अंदाजपत्रकीय रकमेच्या ई-टेंडर फॉर्म फी रुपये 2,000/- प्रमाणे 7 निविदा धारकांची रुपये 14,000/- वसूल करून उपकर किर्दीत जमा घेतलेली दिसून येत नाही.

6) पंचायत समिती पन्हाळा ने निवड केलेले प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे लाभार्थीचे दाखल्यांची उणिवा दिसून आल्या

अ) लाभार्थी प्रस्तावाची छाननी करून महिला बालकल्याण अधिकारी यांनी सही व शिक्क्याने प्रामाणित करणे आवश्यक आहे, ते केलेले नाही.

ब) साहित्य वाटप नोन्दवही तपासले असता लेखापरीक्षण अखेर 77 नग शिलाई मशिन वाटप झालेली नाही. त्याची रक्कम रुपये 3,31,023/- नाहक गुंतून पडलेली आहे.

सदर योजनेकरिता निवडलेल्या लाभार्थी पैकी 77 लाभार्थी यांचा 10 टक्के प्रमाणे रुपये 33,110/- (450X77) लाभार्थी हिस्सा जमा करून घेतलेला नाही. म्हणजेच 77 लाभार्थ्यांची योग्य निवड न होता अनावश्यक खरेदी झाली असून साहित्य खरेदी रक्कम रुपये 3,31,023/- वसूल होणे आवश्यक आहे.

**4.286 आदिवासी भागात कुपोषण व बालमृत्यु प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत बालविकास व ग्रामविकास केंद्र आयोजित करणेबाबत करण्यात आलेल्या खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती धारणी, जिल्हा, अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 45 व 46) -** प्रदान केलेल्या अग्रिमाच्या समायोजन देयकाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक आरोग्य केंद्र साद्राबाडीकरीता बालविकास उपचार केंद्र व ग्रामविकास उपचार केंद्राकरीता रुपये 3,49,800/- अग्रिम मंजूर करण्यात आला असून दिनांक 31/03/2016 अखेर पावेतो रुपये 2,96,668/- समायोजन करण्यात आले असून रुपये 53,132/- चे समायोजन होणे बाकी आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र बिजूधावडी, बैरागड, कळमखार, हरीसाल, धुळघाट रेल्वे, साद्रावाडी यांना अग्रिम नोंदवही नुसार रुपये 16,11,820/- एवढा अग्रिम प्रदान करण्यात आलेला आहे. परंतु सदर अग्रिमापैकी रुपये 3,11,734/- एवढया अग्रिमाचे समायोजन करण्यात आलेले आहे. रुपये 13,00,086/- एवढया अग्रिमाचे समायोजन करण्यात आलेले नाही. खुलासा करावा. सदर अग्रिमाचे समायोजन करुन खर्च नियमानुसार करण्यात आल्याबाबत अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 210 प्रमाणे गटविकास अधिकारी यांना रुपये 500/- अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार असतांना गटविकास अधिकारी यांनी वरीलप्रमाणे अधिकार नसतांना अग्रिम मंजूर केल्याचे आढळुन येते.

3) ग्रामबालविकास केंद्र समायोजन देयकाची तपासणी केली असता ग्राम बालविकास केंद्रामध्ये भरती 210 लाभार्थी बालकाच्या दिनांक 17/07/2015 ते 14/03/2016 श्रेणी sam/mam भरती बालकांच्या उपचाराकरीता प्रति बालक रुपये 1,200/- प्रमाणे रुपये 2,52,200/-खर्च करण्यात आला. परंतु सदर खर्च कोणत्या बाबीवर व कोणत्या निकषाप्रमाणे करण्यात आला याबाबत देयकासोबत अभिलेखे जोडण्यात आले नाहीत. त्यामुळे निकषाप्रमाणे खर्च केल्याबाबत खात्री होत नाही.

4) शिबीराकरीता औषधी खरेदीकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे मागणी नोंदवून किंवा जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन औषधी खरेदी करणे आवश्यक असतांना केवळ प्राप्त अनुदान खर्ची घालण्याचे हेतूने जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे मागणी न नोंदविता किंवा औषधी उपलब्ध नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेवून खाजगी विक्रेत्याकडून औषधी खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) बाल उपचार केंद्राकरीता उपप्रमाणकान्वये औषधी खरेदीवर खर्च करण्यात आला असून सदर खर्चाचे अनुषंगाने औषधीचे साठा नोंदवही तपासणीकरीता उपलब्ध झाली नाही. त्यामुळे औषधी खरेदीवर करण्यात आलेल्या खर्चाची खात्री करता आली नाही.

6) बालविकास केंद्र समायोजन देयकाची तपासणी केली असता उपप्रमाणक क्रमांक 12, दिनांक 31/12/2015 नुसार श्रीमती लक्ष्मीबाई रामप्रसाद खुटेला यांना दिनांक 11/12/2015 ते 31/12/2015 या कालावधीत भरती लाभार्थ्यांना डब्बा पुरविणेबाबत प्रती लाभार्थी प्रती डब्बा करीता रुपये 50/- प्रमाणे 336 डब्बे पुरविण्याबाबत रुपये 16,800/-खर्च नोंदविण्यात आला आहे. परंतु सदर खर्चाबाबत दैनिक नोंदवही ठेवण्यात आली नाही. तसेच दरपत्रके मागवून खर्च केल्याबाबत नस्ती तपासणीकरीता उपलब्ध झाली नाही. (परिच्छेद क्रमांक 45)

7) बालविकास केंद्र भरती बालकांच्या माता / पालकांचे बुडीत मजूरी खर्चाची तपासणी केली असता एकुण 7 पालकांच्या 21 दिवसाचे मजूरीवर प्रतीदिन रुपये 100/- प्रमाणे रुपये 14,700/- व 1 पालकांचे 13 दिवसाचे प्रतीदिन रुपये 100/- प्रमाणे रुपये 1,300/- असे एकुण रुपये 16,000/- खर्च करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, महिला व बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि 2009/प्र.क्र.181/का-5, दिनांक 17/09/2010 मधील परिच्छेद क्रमांक 6.6 नुसार माता व पालकाच्या बुडीत मजूरी वरील खर्च प्रतीदिन रुपये 60/- असतांना उपरोक्त तपशिलाप्रमाणे रुपये 100/- प्रमाणे बुडीत मजूरीबाबत प्रतीदिन खर्च रुपये 100/- करण्यात आला आहे. त्यामुळे बुडीत मजूरीवर रुपये 6,400/- जादा खर्च करण्यात आला आहे. सबब जादा प्रदानाबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुलीची कार्यवाही करावी. (परिच्छेद क्रमांक 45)

8) बालविकास केंद्रातील दिनांक 11/12/2015 ते 31/12/2015 या कालावधीतील भरती बालकांना प्रतिदिन 5 लिटर दुध प्रति लिटर रुपये 40/- प्रमाणे 21 दिवसाकरीता रुपये 4,200/- खर्च नोंदविला आहे. परंतु खर्चाचे अनुषंगाने नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे खर्चाची खात्री करता आली नाही. (परिच्छेद क्रमांक 45)

9) प्राथमिक आरोग्य केंद्र बिजूधावडी, धुळघाट रेल्वे यांनी सदर अग्रिम समायोजन रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेले नाही. (परिच्छेद क्रमांक 46)

10) प्राथमिक आरोग्य केंद्र बिजूधावडी, धुळघाट रेल्वे यांनी कोणत्याही प्रकारची खर्चाबाबत नस्ती त्यांचे स्तरावर न ठेवल्याने सदर खर्च योग्यरितीने करण्यात आला, याबाबत पडताळणी करता आली नाही. (परिच्छेद क्रमांक 46)

11) भाजीपाला व किराणा खरेदीवर खर्च करण्यात आलेला आहे. सदर खरेदीबाबत कोणत्याही प्रकारचे साठापुस्तके ठेवण्यात आलेले नाहीत. तसेच सदर साहित्याचा कोठे वापर झाला याबाबत साठापुस्तकाअभावी पडताळणी करता आली नाही. तरी सदर खरेदी योग्य दराने व त्याचा वापर प्रत्यक्षात झाल्याबाबत सप्रमाण दर्शवावे. (परिच्छेद क्रमांक 46)

**4.287 श्री.ए.आर.पांढरे निलंबित औषधी निर्माता अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कोसरसार यांचे निर्वाह भत्ता अदा करणेबाबत.**

**पंचायत समिती वरोरा, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,50,878/- खर्च नोंदविला आहे. श्री.ए.आर.पांढरे निलंबित औषधी निर्माता अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कोसरसार यांचे निर्वाह भत्ता अदा करतांना नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणात आढळुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबंधीत अधिकारी यांना प्राथमिक आरोग्य केंद्र, नवेगांव मोरे येथुन उपरोक्त आदेश क्रंमांक 1 व 2 नुसार निलंबित करुन त्यांचे मुख्यालय प्राथमिक आरोग्य केंद्र, पाथरी, पंचायत समिती सावली अंतर्गत ठेवण्यात आल्याचे दिसुन येते. नियमानुसार सबंधितांचे निर्वाह भत्ता देयक सावली पंचायत समिती अंतर्गत पाथरी आरोग्् केंद्रामधुन आहरीत करणे बंधनकारक असतांना वरोरा पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, कोसरसार येथुन कसे काय आहरीत करण्यात आले याचा बोध होत नाही.

2) नियमानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, पाथरी यांचेकडील नादेय प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना वैदयकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, नवेगाव मोरे यांनी त्यांचे क्रमांक वैअ/स्था/कस/162/15 दिनांक 13/08/2015 नुसार नादेय प्रमाणपत्र कोणत्या आधारे निर्गमित केले व ते प्रदान करतांना कसे काय मान्य करण्यात आले याबाबत समर्पक खुलासा करावा.

3) श्री.पांढरे यांना निलंबित केल्यानंतर मुख्यालय प्राथमिक आरोग्य केंद्र, पाथरी येथे पदस्थापना केल्याचे आदेशावरुन दिसुन येत असतांना त्यांचे निर्वाह भत्याचे प्रदान प्राथमिक आरोग्य केंद्र, कोसरसार येथुन केलेले आहे. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्र, पाथरी यांचेकडील नादेय प्रमाणपत्र देयकासोबत लेखापरीक्षणात आढळुन आलेले नसल्यामुळे त्यांना पाथरी व कोसरसार या दोन्ही ठिकाणहु न प्रदान झालेले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत समर्पक पुराव्यासह पुर्तता अहवाल सादर करावा.

4) सदर देयकासोबत जोडलेल्या आयकर गणना पत्रकाची तपासणी केली असता माहे डिसेंबर 12 ते फेब्रुवारी 13 पर्यतच्या रक्कमेचा समावेश करण्यात आलेला नाही. तसेच सबंधितांच्या सदर थकबाकीच्या रक्कमेचा समावेश करुन सन 2015-2016 चे आयकर गणना करावयास पाहिजे होती. तशी कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे आयकर गणना पत्रक सुधारीत करुन उर्वरीत आयकराची रक्कम कपात करावी.

5) वैदयकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे दिनांक 15/03/2015 चे आदेशानुसार मुदतबाहय मागण्यासाठी मंजुरी प्रदान केलेली असल्याचे दिसुन येते मुदतबाहय मागण्याची मंजुरी प्रदान करण्यासाठी वैदयकीय अधिकारी सक्षम असल्याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत लेखापरीक्षणास सादर करावे.

6) वैदयकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे दिनांक 15/03/2015 चे आदेशामध्ये त्यांनी पंचायत समिती व जिल्हा परिषद लेखा सहिंता 1962 मधील नियमांचा आधार घेतल्याचे आदेशावरुन दिसुन येते. परंतु असे नियम व कायदे अस्तित्वात असल्याबाबतचा सबळ पुरावा लेखापरीक्षणास सादर करावा.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा सहिंता 1968 चे नियम 45 नुसार मुदतबाहय मागण्या पंचायत समितीची मान्यता घेवुनच अदा करणे आवश्यक असतांना सुध्दा तसा ठराव किंवा सक्षम प्राधिका-यांचे मंजुरीचे आदेश देयकासोबत जोडलेले लेखापरीक्षणात आढळुन आले नाही. सदर ठराव किंवा मंजुरी आदेश प्राप्त होईपर्यत संपुर्ण रक्कम नियमबाहय प्रदान ठरते.

8) प्राथमिक आरोग्य केंद्र, कोसरसार ची स्थापना कधी झाली, ती जर सन 1977 नंतर झालेली असेल तर सन 1977 चा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदेश (अधिकार प्रदानाचा) कसा लागु होतो याबाबत खुलासा करावा.

9) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपुर यांचे दिनांक 06/09/2012 चे निलबंन आदेशामध्ये निलबंन काळात कोणताही धंदा अथवा व्यवसाय केलेला नाही. असे प्रमाणपत्र प्रस्तुत करणे अनिवार्य केलेले असतांना देयकासोबत अशा प्रकारचे प्रमाणपत्र पहावयास मिळाले नाही. त्यामुळे निलबंन काळामध्ये संबंधितांनी खाजगी व्यवसाय केला किंवा नाही. याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. तेव्हा प्रमाणपत्राविना प्रदान कसे काय करण्यात आले याबाबत खुलासा करावा.

**4.288 सोलार वॉटर हिटर खरेदीबाबत.**

**पंचायत समिती फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,82,386/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती फुलंब्रीचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी वरील प्रमाणे सौर उर्जा संयंत्र खरेदी प्रक्रिया केली आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-1000/प्र.क्र.14/कोषा-4, दिनांक 11/02/2000 मधील अट क्रमांक 2 नुसार वित्तीय वर्षात 15 फेब्रुवारी नंतर कार्यालयांनी यंत्रसामुग्री, उपकरणे, फर्निचर, संगणक यांच खरेदीच्या प्रस्तावांना मंजूरी देवू नये. अट क्रमांक 3 नुसार 15 फेब्रुवारी नंतर असे प्रस्ताव प्राप्त झाल्यास ते पारित करु नयेत, असे निर्देश आहेत. वरील प्रकारच्या खरेदीबाबत दिनांक 14/03/2016 रोजी प्रस्ताव तयार करून त्यानंतर खरेदी प्रक्रिया करण्यात आली. अनियमिततेबाबत खुलासा करावा.

2) स्कायलार्क थर्मल एनर्जी पुणे व यश सोलार पुणे यांची दोन वेगळी दरपत्रके प्राप्त झाली आहेत. मात्र दोन्ही दरपत्रकांवर एकच दुरध्वनी क्रमांक नमुद आहे. म्हणजेच स्वतंत्र पुरवठादार नसुन एकच पुरवठादार आहे. त्यामुळे खरेदी प्रक्रियाच संदिग्धपणे राबविले असे म्हणता येईल.